# <u>प्रेसनोट दि.०८/०६/२०१९</u>

## <u>सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे</u>

सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत वडगाव मार्शल कर्मचारी सचिन तुपसौंदर व सुहास मोरे यांनी सर्तक डयुटी करुन केली उत्कृष्ट कामगिरी

---

दि. ०६/०६/२०१९ रोजी सचिन भारत तुपसौंदर, पो.शि. ८७४४ व पो.शि. १०११४ सुहास मोरे, सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे यांना वडगाव मार्शलवर दिवसपाळी कर्तव्यावर पेट्रोलींग करीत असताना दुपारी १३.१५ वा. चे सुमारास नियंत्रण कक्ष पुणे शहर यांनी पांढया रंगाची बुलेट गाडी नं. एम.एच. १२, ५१६१ हीचेवर दोन मुले कोयता घेवुन नित्यानंद हॉल ते हिंगणे चौक दरम्यान फिरत आहेत असा संदेश नियंत्रण कक्षाकडुन वॉकीटॉकीवर मिळाल्याने तात्काळ वडगाव मार्शलचे पोलीस कर्मचारी सचिन तुपसौंदर, पो.शि. ८७४४ व पो.शि. १०११४ सुहास मोरे यांनी सदर बुलेट गाडीचा शोध घेण्यास सुरुवात केली असता हिंगणे कॅनॉल लगत त्यांना समोरुन पांढया रंगाची बुलेट गाडी नं. एम.एच. १२ पी.एस. ५१६१ हिचेवरुन दोघेजण येत असताना दिसले. त्यावेळी वडगाव मार्शल पोलीस कर्मचारी सचिन तुपसौंदर व सुहास मोरे यांनी त्यांना थांबवुन त्यांची तपासणी केली असता त्यांना सदर बुलेट गाडीचालक नामे आदित्य रणजित चंदेले, वय २० वर्षे, रा. अपुर्व रेसिडेन्सी, फ्लॅट नं. ३, नित्यानंद हॉल समोर हिंगणे खुर्द, पुणे याचे उजवे कमरेजवळ एक लोखंडी धारदार कोयता खोचलेला आढळुन आला. सदरचा कोयता मार्शल कर्मचारी यांनी ताब्यात घेतला. सदर इसमाचे पाठीमागे बसलेल्या इसमाचे नाव यश सुरेश लाटमे, वय १९ वर्षे, रा. अपुर्व रेसिडेन्सी, फ्लॅट नं. ३, नित्यानंद हॉल समोर हिंगणे खुर्द, पुणे असल्याचे त्यांनी सांगीतले. सदर दोन्ही मुलांना ताब्यात घेण्यात आले आहे.

अशा प्रकारे इसम नामे १) आदित्य रणजित चंदेले, वय २० वर्षे, रा. अपुर्व रेसिडेन्सी, फ्लॅट नं. ३, नित्यानंद हॉल समोर हिंगणे खुर्द, पुणे व २) यश सुरेश लाटमे, वय १९ वर्षे, रा. अपुर्व रेसिडेन्सी, फ्लॅट नं. ३, नित्यानंद हॉल समोर हिंगणे खुर्द, पुणे यांनी अनाधिकाराने बेकायदेशीररीत्या धारदार लोखंडी कोयता जवळ बाळगलेला असताना बुलेटसह मिळुन आल्याने मा. पोलीस सह आयुक्त सो. यांचे आदेशाने पुणे शहरात शस्त्र, लाठया, काठया, वापरण्यास बंदी आदेश असताना त्याचा भंग केला म्हणुन सदर इसमांचे विरुध्द आर्म अ‍ॅक्ट कलम ४ (२५) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यांना दाखल गुन्हयात अटक करुन पो.शि. ८७४४ सचिन तुपसौंदर व पो.शि. १०११४ सुहास मोरे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.